महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: itdept@maa.ac.in

---

जा.क्र. राशैसंप्रपम/ आय.टी./शिव्हिनिस्प२३/२०२३/०३३३३ दिनांक : २०/०७/२०२३

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व),
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
५. शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक (सर्व),
६. शिक्षण निरीक्षक, मुंबई, (पश्चिम/दक्षिण/उत्तर)
७. प्रशासन अधिकारी, मनपा/नपा (सर्व)

**विषय:- शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ करिता नावनोंदणी व व्हिडीओ अपलोड करणेबाबत...**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/ प्र. क्र. ४१/ एस.डी. ४, दि.११.०५.२०२३.
२) या कार्यालयाची मान्य टिपणी दि. १२/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ बाबत आयोजन, सविस्तर सूचना वितरण व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना सोपविण्यात आलेले आहेत. यानुसार २०२३-२४ दरम्यान शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३ साठी नियोजन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीमध्ये प्रस्तुत स्पर्धेसाठी राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या शाळातील शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक-प्रशिक्षक यांचे कडून आवेदन स्वीकारण्याचे प्रक्रियेस मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार सदर स्पर्धेसाठी ऑनलाईन नावनोंदणीकरिता परिषदेमार्फत **https://scertmaha.ac.in/vcomp2023/** ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदरील लिंकवर स्पर्धेत भाग घेण्यास इच्छुक शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक-प्रशिक्षक यांनी नोंदणी करावयाची आहे.

**स्पर्धेसाठी आवश्यक अटी :- (कृपया अटी काळजीपूर्वक वाचूनच अर्ज भरावा)**

१. स्पर्धेकरिता नोंदणी करणेसाठी परिषदेच्या ऑनलाईन **https://scertmaha.ac.in/vcomp2023/** या संकेतस्थळास भेट देवून आपली सर्व माहिती अचूक भरावी.

२. उमेदवारांना कोणत्याही एका गटासाठीच अर्ज सादर करावा. एका उमेदवारास एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत.
३. ज्या शिक्षकांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे त्यांना तालुका/जिल्हा/राज्य पातळीवरील निवड समितीत सदस्य म्हणून घेवू नये. याबाबतची खात्री संबंधित तालुका/जिल्हा/राज्य पातळीवरील निवड समितीने करावी.
४. स्पर्धेची नोंदणी व व्हिडीओ अपलोड प्रक्रिया **दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२३ पर्यंत** सुरु राहणार आहे. स्पर्धेची नोंदणी **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी रात्री १२.००** वाजता बंद होईल.
५. उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर व व्हिडीओ अपलोड संदर्भ क्र. १ चे निकषानुसार त्यांचे प्रथम तालुका स्तरावर मूल्यमापन होईल. तालुका स्तरावरील यशस्वी उमेदवार जिल्हा स्तरावरील मूल्यमापनासाठी पाठविण्यात येतील. त्यानंतर जिल्यातील यशस्वी उमेदवार राज्यस्तरीय मूल्यमापनासाठी पाठविण्यात येतील. असे सर्व ३६ जिल्यातील उमेदवारांमधून योग्य उमेदवार राज्यस्तरावर राज्य स्तरीय निवड समिती मार्फत निवडून त्यांना पारितोषिके देण्यात येतील.
६. यासाठी उमेदवारांना संबधित जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतून पुढील सूचना देण्यात येतील.
७. प्रस्तुत स्पर्धेसाठी पुढीलप्रमाणे ०६ गट करण्यात आलेले आहेत
    - गट क्र.१- १ ली व २ री
    - गट क्र. २- ३ री व ५ वी
    - गट क्र. ३-६ वी ते ८ वी
    - गट क्र. ४- ९ वी ते १० वी
    - गट क्र. ५ - ११ वी व १२ वी
    - गट क्र. ६- अध्यापक विद्यालय
८. स्पर्धेसाठी नावनोंदणी करतेवेळी शिक्षकाने पोर्टलवर शाळेची माहिती, शाळेचा UDISE क्रमांक, अचूक ई-मेल आय.डी, बँक खाते तपशील, व्हिडीओ लिंक इत्यादी माहिती सोबत ठेवावी.
९. स्पर्धेसाठी संबंधितांनी गटनिहाय भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, शिक्षक प्रशिक्षणाशी निगडीत आधुनिक विचार प्रवाह या विषयांपैकी आपला योग्य तो विषय निवडावा.
१०. नावनोंदणी करत असताना खालीलपैकी एका प्रकारावरील व्हिडीओ तयार करावा,

- कोणत्याही सॉफ्टवेअरचा वापर करून स्वतः व्हिडीओ तयार करणे.
- स्वतः स्क्रीन रेकोर्ड करून तयार केलेला व्हिडीओ
- स्वतः केलेला Animated व्हिडिओ
- स्वतः पेन टॅबलेटचा वापर करून बनवलेला व्हिडीओ.
- Immersive eContent (Augmented Reality/ Virtual Reality/ Virtual Lab/३६० Degree/Simulations) वर आधारित व्हिडीओ
- खेळावर आधारित व्हिडीओ (Gamification)
- ई-चाचणीवर आधारित व्हिडीओ (E-assessments)
- शासन प्रणालीवर आधारित बोलीभाषेतून केलेला व्हिडीओ
- दिव्यांगत्व प्रकारानुसार अध्ययनासाठी व्हिडीओ
- राज्य/ राष्ट्रीय शिष्यवृत्ती वर आधारित व्हिडिओ

प्रस्तुत स्पर्धेची विविध स्तरावर करावयाची कालमर्यादा पुढीलप्रमाणे आहे,

| अ. क्र. | स्तर | तपशील/ प्रमुख | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | तालुका | ऑनलाईन नामांकन नोंदणी व व्हिडीओ अपलोड करणे | दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ ते ३१ ऑगस्ट, २०२३ पर्यंत |
| ०२ | तालुकास्तर निवड प्रक्रिया (BRC/URC) | गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी | ०१ सप्टेंबर, २०२३ ते १५ सप्टेंबर, २०२३ |
| ०३ | जिल्हास्तर निवड प्रक्रिया | उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण/ प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | १६ सप्टेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ |
| ०४ | राज्यस्तर निवड प्रक्रिया | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | ०१ ऑक्टोबर, २०२३ ते १५ ऑक्टोबर, २०२३ |
| ०५ | राज्यस्तर | समितीमार्फत पडताळणीअंती उत्कृष्ट उमेदवारांची शासनास शिफारस | माहे ऑक्टोबर २०२३ अंती |
| ०६ | राज्यस्तर | पुरस्कार वितरण | नोव्हेंबर २०२३ |

११. तालुका/ जिल्हा /राज्य स्तरावरील सहभागी तसेच विजयी उमेदवारांना बक्षिसे, रोख रक्कम व प्रमाणपत्र वितरीत करणेत येईल.

१२. स्पर्धेचे आयोजन, पारितोषिक स्वरूप, मूल्यमापन/गुणदानाचे निकष, उत्कृष्ट व्हिडीओ निवडीचे निकष, व्हिडीओ निर्मितीसाठी महत्वाच्या बाबी, व्हिडिओ निर्मितीसाठी घ्यावयाची दक्षता, विविध स्तरावरील निवड समिती गठन करणे इ इतर महत्वाच्या बाबींसाठी संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयाचे अवलोकन करणेत यावे.

**व्हिडीओ उमेदवारांचे मूल्यमापन/गुणदान करण्यासाठी खालील निकषांचा वापर करावा,**

| अ. क्र. | निकष | गुण | तपशील |
|---|---|---|---|
| ०१ | स्पष्टपणा (Simplicity) | १५ | प्रस्तावना, शीर्षक, उद्दिष्ट/अध्ययन निष्पत्ती लेखन, समस्या मांडणी, विद्यार्थीकेंद्रित आशय |
| ०२ | गरजाधीष्ठितपणा (Relevance) | १५ | शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा प्रमुख यासाठी उपयुक्त, शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या गरजा, कार्य स्पष्टता |
| ०३ | परिणाम (Impact) | १५ | विविध लाभार्थी, जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतर विविध स्तरावर कार्य, आलेख,सांख्यिकी वापर |
| ०४ | नाविण्यता (Creativity) | १५ | शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, २१ व्या शतकातील कौशल्ये वापर, नवीन संकल्पना, योग्य editing, effects |
| ०५ | समन्वय (Engagement) | १५ | स्थानिक, देश-विदेशातील तज्ज्ञांचे अनुभव, विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा प्रमुख यांचा समावेश, पुरावे |
| ०६ | उपयोगिता (Reusability) | १५ | इतर वर्ग, शाळा, क्षेत्र येथे वापर, सांख्यिकी वापर |
| ०७ | चित्रफित दर्जा (Video Quality) | १० | रंगसंगती, ओळख, उद्दिष्टे, कृती, यशोगाथा, लाभार्थी मते, size, चुकीचे शब्दप्रयोग |
| | **एकूण** | **१००** | |

## उत्कृष्ट व्हिडीओ निवडीचे निकष

- व्हिडीओ निर्मिती साठी आवश्यक आशय - मजकूर आदर्श असावा.
- व्हिडीओ हा विद्यार्थी वयोगट विचारात घेऊन निर्मित केलेला असावा.
- व्हिडीओ ची साईज हि विद्यार्थी किंवा इयत्तेनुसार असावी.
- निर्मित व्हिडीओ मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असेल तर उत्तम.
- व्हिडिओमधील मजकूर, चित्रे, रंगसंगती अचूक व योग्य असावीत.
- शिक्षकांनी स्वतः केलेले व्हिडीओ चित्रीकरण, सादरीकरण, एडिटिंग इत्यादी बाबींना महत्व असेल.
- आवाजात सुस्पष्टता असावी. आवाजाची / बोलण्याची  गती योग्य प्रमाणात असावी. आवाज आरोह-अवरोह युक्त असावा. बॅंकग्राउंड नॉईज नसावा. जर बॅकग्राउंड म्युझिक घेणार असाल तर ते कमी आवाजात असावे. बॅकग्राउंड म्युझिक व आवाज हे स्लाईडच्या आशयाशी संबंधित असावे.

## व्हिडीओ निर्मितीसाठी महत्वाच्या बाबी-

- शैक्षणिक अभ्यासक्रमावर आधारितच व्हिडीओ बनविणे आवश्यक आहे.
- वरील व्हिडीओ अध्ययन-अध्यापन प्रणालीशी निगडीत असणे आवश्यक
- व्हिडिओ बनविणार्याने स्वत: चा थोडक्यात परिचय समावेश करावा.
- व्हिडीओ कन्टेन्ट निर्मिती करणाऱ्या शिक्षकाचे नाव, शाळा, पत्ता या बाबी व्हिडिओमध्ये समाविष्ठ करू नयेत. व्हिडिओच्या शेवटी या बाबी फक्त स्क्रिनवर दिसाव्यात.
- घटक, व्हिडिओमधून कोणती अध्ययन निष्पत्ती साध्य होणार आहे, हे सुरुवातीला स्क्रिनवर दाखवावे.
- व्हिडीओ ची लांबी कमीत कमी ५ मि. व जास्तीत जास्त ९ मिनिटांची असावी.
- व्हिडीओ फॉरमॅट MP4 असावा.
- व्हिडीओ मध्ये कुठेही स्वतःच्या समाज माध्यमांची, व्यावसायिक जाहिरात समाविष्ट नसावी.

- व्हिडीओ मधील मजकूर व आशयाबाबत पूर्णतः संबंधित शिक्षक जबाबदार असणार आहे, याची नोंद घ्यावी.
- व्हिडीओ मध्ये वापर करण्यात येणारी इमेज अथवा मजकूर हा कॉपीराईट मुक्त (Creative Commons) असण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.  कॉपीराईटची लायसन्सच्या सर्व मार्गदर्शक सूचनांची काळजी घ्यावी. याबाबत काही आक्षेप आल्यास संबंधित स्पर्धक जबाबदार असतील.
- राज्यस्तरावरून निवड करण्यात आलेल्या व्हिडीओजच्या creator ला तो व्हिडीओ त्यांनीच तयार केला आहे हे सिद्ध करावे लागेल. अन्यथा तो व्हिडीओ स्पर्धेतून बाद करण्यात येईल.
- शैक्षणिक व्हिडिओच्या दर्जानुसार शिक्षकांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाईल व सदरच्या दर्जेदार  शैक्षणिक व्हिडीओज हे त्याच्या creator च्या नावासह शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.
- स्टॉक शॉट्स किंवा कोणतेही कॉपीराइट केलेले ग्राफिक्स/इमेज संकलित करून तयार केलेले व्हिडिओ स्पर्धेसाठी पात्र नसतील.
- एका स्पर्धकाने एका गटासाठी फक्त एकच व्हिडिओ पाठवावा.
- सर्व नोंदींची एक प्रत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राखून ठेवली जाईल.

- पुरस्कार विजेत्या व्हिडिओचे प्रसारण DIKSHA/OER आणि शासनाद्वारे व्यवस्थापित इतर वेबसाइट्स/पोर्टलवर अपलोड करण्यात येतील.
- तालुका/ जिल्हा/ राज्य स्तरावरील स्पर्धांचे निकाल तालुका/ जिल्हा/ राज्य निवड समिती मार्फत अंतिम केला जाईल (स्वतंत्रपणे ऑडिओ आणि ॲनिमेशन/इमर्सिव्ह ई-कॉन्टेंट/डिजिटल गेम्स आणि ॲप्लिकेशन श्रेणीसाठी) ज्युरीने घोषित केलेले निकाल बंधनकारक असतील.

**व्हिडिओ निर्मितीसाठी पुढील दक्षता पाळण्यात यावी-**

- कोणत्याही प्रकारची हिंसा, लैंगिक प्रदर्शन, असभ्य भाषा, अमली पदार्थांचा वापर यांचा व्हिडीओ निर्मितीत समावेश असल्यास,
- वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक, स्त्रिया किंवा लिंग पूर्वाग्रहाचे समर्थन करणारी सामग्री व्हिडीओ निर्मितीत समावेश असल्यास,
- तांत्रिक त्रुटीं असल्यास ( उदा. सुरु न होणे, मध्येच बंद होणे) ,
- कोणत्याही कॉपीराइट ©, वैयक्तिक बौद्धिक संपदा (IPR), Creative Commons कायद्याचे उल्लंघन असल्यास,
- साहित्यिक चोरीचा (plagiarism)समावेश असल्यास,

असे व्हिडीओ पडताळणी अंती कोणत्याची स्तरावर बाद करण्यात येतील. यावर स्पर्धकाचा कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१३.शिक्षकांनी आपले तयार केलेले व्हिडीओ आपल्या गुगल ड्राईव्ह (Google Drive) ला अपलोड करून Anyone with link करून Editor त्याचा Access हा ठेवावा व सदरची लिंक ही उपलब्ध देण्यात येणाऱ्या प्रणालीवर अपलोड करण्यात यावी.

उपरोक्त सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील इच्छुकांना आपल्या स्तरावरून निदर्शानास आणून द्याव्यात व सदर स्पर्धेसाठी जास्तीत जास्त उमेदवारांना नावनोंदणी करण्यास आदेशित करण्यात यावे . स्पर्धेच्या अधिकच्या समन्वयासाठी परिषदेतील खालील क्रमांकावर संपर्क साधावा.


1. **श्री. योगेश सोनवणे, उपविभागप्रमुख, मो. क्र. ९१४५८२५१४४**
2. **डॉ. संदीप मुळे, अधिव्याख्याता, मो. क्र. ८६९२८५७२२२**
3. **श्री. अभिनव भोसले, विषय सहाय्यक, मो. क्र. ७७२२०७४२९४**


(कौस्तुभ दिवेगावकर )
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

**सोबत- संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयाची प्रत**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-१.
३) मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४१/एसडी -४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११ मे, २०२३.

**प्रस्तावना :-**

आजच्या आधुनिक काळामध्ये ऑनलाईन शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. शैक्षणिक तंत्रज्ञानाद्वारे शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता निर्माण करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून माहिती संप्रेषण आणि तंत्रज्ञान (ICT) तंत्रज्ञानाचा सध्या मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसत आहे. यामुळे डिजिटल शिक्षणाचे वेगळेच महत्त्व निर्माण झालेले आहे. कोविड-१९ काळात प्रत्यक्ष शाळा बंद असताना ऑनलाईन शिक्षणाच्या विविध माध्यमाद्वारे व साधनांद्वारे वर्गा-वर्गातून अध्ययन-अध्यापन प्रणाली घडतांना दिसून येत होती. शिक्षक, विद्यार्थी कधी शाळेच्या ओट्यावर, कधी शेतात, कधी मंदिराच्या ओट्यावर, कधी निवासी पार्किंग मध्ये तर कधी गल्लीतील चौकात एकत्र येवून ऑनलाईन प्रणालीने अभ्यास, चाचण्या पूर्ण करतांना दिसत होते. शिक्षक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले अध्यापन अधिक रंजक आणि दर्जेदार करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. तसेच विद्यार्थी याच डिजिटल साधनांचा वापर करून आपले अध्यापन सुकर करताना आढळून येत आहे. राज्यामधील शिक्षकांमध्ये तंत्रस्नेही चळवळ अधिक सक्रीय होऊन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेमार्फत राज्यातील २,८९,५६० शिक्षक हे तंत्रस्नेही झाल्याचे आढळून आले आहे. या शिक्षकांनी फक्त आपापले वर्गच ऑनलाईन घेतलेले नाहीत तर स्वतःच्या विद्यार्थ्यांनाही तंत्रस्नेही केलेले आहे, ज्यामुळे आज राज्यातील विद्यार्थी स्वतः डिजिटल साहित्य तयार करून आपले शिक्षण मनोरंजक करत आहेत, इतर देशातील शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी ऑनलाईन संवाद साधून विविध साहित्य वापरत आहेत. उदा. शैक्षणिक व्हिडीओ, मनोरंजक खेळ, AI/AR/VR वापर करून बनविलेले ई-साहित्य, कृतियुक्त PDF, आनंददायी PPT, पोस्टर्स, प्रमाणपत्रे आदी. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाच्या साह्याने अध्यापन करत असताना शिक्षकांमार्फत बनवले गेलेले ई-साहित्य हे जास्त परिणामकारक असल्याचे दिसून येते.

शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन ई-साहित्य निर्मितीची चळवळ उभी रहावी; यासाठी राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक/शिक्षक-प्रशिक्षक स्तरावरील शिक्षक, मुख्याध्यापक यांचेसाठी राज्यस्तर दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीची खुल्या स्पर्धेचे शासनामार्फत आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन ई-साहित्य निर्मितीची चळवळ उभी रहावी; यासाठी राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक/शिक्षक-प्रशिक्षक स्तरावरील शिक्षक, मुख्याध्यापक यांचेसाठी राज्यस्तर दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मितीची खुल्या स्पर्धेचे शासनामार्फत आयोजित करण्यात येत आहे. सदरच्या स्पर्धेचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र | इयत्ता | विषय | शैक्षणिक व्हिडीओ प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | १ ली व २ री | भाषा, गणित, इंग्रजी | • कोणत्याही सॉफ्टवेअरचा वापर करून स्वतः व्हिडीओ तयार करणे.<br>• स्वतः स्क्रीन रेकोर्ड करून तयार केलेला व्हिडीओ |
| ०२ | ३ री ते ५ वी | भाषा, गणित, इंग्रजी, परिसर अभ्यास | |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | ६ वी ते ८ वी | भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे | • स्वतः केलेला Animated व्हिडिओ<br>• स्वतः पेन टॅबलेटचा वापर करून बनवलेला व्हिडीओ.<br>• Immersive eContent (Augmented Reality / Virtual Reality / Virtual Lab/ 360 Degree/ Simulations) वर आधारित व्हिडीओ<br>• खेळावर आधारित व्हिडीओ (Gamification)<br>• ई-चाचणीवर आधारित व्हिडीओ (E-assessments)<br>• शासन प्रणालीवर आधारित बोलीभाषेतून केलेला व्हिडीओ<br>• दिव्यांगत्व प्रकारानुसार अध्ययनासाठी व्हिडिओ. |
| ०४ | ९ वी ते १० वी | भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे | |
| ०५ | ११ वी व १२ वी | भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे | |
| ०६ | अध्यापक विद्यालय | भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, शिक्षक प्रशिक्षणाशी निगडीत आधुनिक विचार प्रवाह | |

शिक्षकांनी आपले तयार केलेले व्हिडीओ आपल्या गुगल ड्राईव्ह (Google Drive) ला अपलोड करून Anyone with link करून Editor त्याचा Access हा ठेवावा व सदरची लिंक ही उपलब्ध देण्यात येणाऱ्या प्रणालीवर अपलोड करण्यात यावी.

स्पर्धेचे आयोजन- (तालुका/ जिल्हा/ राज्य स्तर)

| **अ. क्र.** | **स्पर्धेचा स्तर** | **गट** | **गट व विषय निहाय पुरस्कार संख्या** | | | | | | **जबाबदार संस्था** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **भाषा** | **गणित** | **इंग्रजी** | **विज्ञान/ परि. अभ्यास** | **सामाजिक शास्त्रे** | **शिक्षण-प्रशिक्षणातील नवीन विचार प्रवाह** | |
| १ | **तालुका (एकूण ८४ पुरस्कार)** | **इयत्ता १ ते २** | प्रथम -०१<br>द्वितीय-०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | - | - | गटशिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी |
| | | **३ री ते ५ वी** | प्रथम -०१<br>द्वितीय-०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | - | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **६ वी ते ८ वी** | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | - | |
| | | **९ वी ते १० वी** | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | - | |
| | | **११ वी व १२ वी** | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | - | |
| | | **अध्यापक विद्यालय** | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | |
| | | | | | | | | | |
| | | | **भाषा** | **गणित** | **इंग्रजी** | **विज्ञान/ परि. अभ्यास** | **सामाजिक शास्त्रे** | **शिक्षण-प्रशिक्षणातील नवीन विचार प्रवाह** | |
| २ | जिल्हा (एकूण ८४ पुरस्कार) | **इयत्ता १ ते २** | प्रथम -०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | प्रथम - ०१ द्वितीय- ०१ तृतीय- ०१ | - | - | - | **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **३ री ते ५ वी** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | - | |
| | | **६ वी ते ८ वी** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |
| | | **९ वी ते १० वी** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |
| | | **११ वी व १२ वी** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |
| | | **अध्यापक विद्यालय** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | |
| | | | | | | | | | |

| | | | भाषा | गणित | इंग्रजी | विज्ञान/ परि. अभ्यास | सामाजिक शास्त्रे | शिक्षण-प्रशिक्षणातील नवीन विचार प्रवाह | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | राज्य (एकूण ८४ पुरस्कार) | इयत्ता १ ते २ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | - | - | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था |
| | | ३ री व ५ वी | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | - | |
| | | ६ वी ते ८ वी | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |
| | | ९ वी ते १० वी | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **११ वी व १२ वी** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | - | |
| | | **अध्यापक विद्यालय** | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम - ०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | प्रथम -०१<br>द्वितीय- ०१<br>तृतीय- ०१ | |

पारितोषिके स्वरूप-

| **अ. क्र.** | **स्तर** | **क्रमांक** | **बक्षिसाचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| ०१ | तालुका | प्रथम | (रु. ३०००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | द्वितीय | (रु. २०००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | तृतीय | (रु. १५००/-) रोख व प्रमाणपत्र |
| ०२ | जिल्हा | प्रथम | (रु. १००००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | द्वितीय | (रु. ९०००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | तृतीय | (रु. ८०००/-) रोख व प्रमाणपत्र |
| ०३ | राज्य | प्रथम | (रु. ५००००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | द्वितीय | (रु. ४००००/-) रोख व प्रमाणपत्र |
| | | तृतीय | (रु. ३००००/-) रोख व प्रमाणपत्र |

व्हिडीओ उमेदवारांचे मूल्यमापन/गुणदान करण्यासाठी खालील निकषांचा वापर करावा,

| **अ. क्र.** | **निकष** | **गुण** | **तपशील** |
|---|---|---|---|
| ०१ | स्पष्टपणा (Simplicity) | १५ | प्रस्तावना, शीर्षक, उद्दिष्ट/अध्ययन निष्पत्ती लेखन, समस्या मांडणी, विद्यार्थीकेंद्रित आशय |
| ०२ | गरजाधीष्ठितपणा (Relevance) | १५ | शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा प्रमुख यासाठी उपयुक्त, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या गरजा, कार्य स्पष्टता, |
| ०३ | परिणाम (Impact) | १५ | विविध लाभार्थी, जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतर-राष्ट्रीय विविध स्तरावर कार्य, आलेख,सांख्यिकी वापर |
| ०४ | नाविण्यता (Creativity) | १५ | शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, २१ व्या शतकातील कौशल्ये वापर, नवीन संकल्पना, योग्य editing |
| ०५ | समन्वय (Engagement) | १५ | स्थानिक, देश-विदेशातील तज्ज्ञांचे अनुभव, विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा प्रमुख यांचा समावेश, पुरावे |
| ०६ | उपयोगिता (Reusability) | १५ | इतर वर्ग, शाळा, क्षेत्र येथे वापर, सांख्यिकी वापर |
| ०७ | चित्रफित दर्जा (Video Quality) | १० | रंगसंगती, ओळख, उद्दिष्टे, कृती, यशोगाथा, लाभार्थी मते, size, चुकीचे शब्दप्रयोग |
| | एकूण | १०० | |

उत्कृष्ट व्हिडीओ निवडीचे निकष -

- व्हिडीओ निर्मिती साठी आवश्यक आशय - मजकूर आदर्श असावा.
- लिंग समभाव,शासकीय ध्येय धोरणाशी सुसंगत आशय असावा.
- व्हिडीओ हा विद्यार्थी वयोगट विचारात घेऊन निर्मित केलेला असावा.
- व्हिडीओ ची साईज ही विद्यार्थी किंवा इयत्तेनुसार असावी.
- निर्मित व्हिडीओ मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असेल तर उत्तम.
- व्हिडिओमधील मजकूर, चित्रे, रंगसंगती अचूक व योग्य असावीत.
- शिक्षकांनी स्वतः केलेले व्हिडीओ चित्रीकरण, सादरीकरण, एडिटिंग इत्यादी बाबींना महत्व असेल.
- आवाजात सुस्पष्टता असावी. आवाजाची / बोलण्याची गती योग्य प्रमाणात असावी. आवाज आरोह-अवरोह युक्त असावा. बँकग्राउंड नॉईज नसावा. जर बँकग्राउंड म्युझिक घेणार असाल तर ते कमी आवाजात असावे. बँकग्राउंड म्युझिक व आवाज हे स्लाईडच्या आशयाशी संबंधित असावे.

व्हिडीओ निर्मितीसाठी महत्वाच्या बाबी -

- शैक्षणिक अभ्यासक्रमावर आधारितच व्हिडीओ बनविणे आवश्यक आहे.
- वरील व्हिडीओ अध्ययन-अध्यापन प्रणालीशी निगडीत असणे आवश्यक
- व्हिडिओ बनविणाऱ्याने स्वत: चा थोडक्यात परिचय समावेश करावा.
- व्हिडीओ कन्टेन्ट निर्मिती करणाऱ्या शिक्षकाचे नाव, शाळा, पत्ता या बाबी व्हिडिओमध्ये समाविष्ट करू नयेत. व्हिडिओच्या शेवटी या बाबी फक्त स्क्रिनवर दिसाव्यात.
- घटक, व्हिडिओमधून कोणती अध्ययन निष्पत्ती साध्य होणार आहे, हे सुरुवातीला स्क्रिनवर दाखवावे.
- व्हिडीओ ची लांबी कमीत कमी ५ मि. व जास्तीत जास्त ९ मिनिटांची असावी.
- व्हिडीओ फॉरमॅट MP४ असावा.
- व्हिडीओ मध्ये कुठेही स्वतःच्या समाज माध्यमांची, व्यावसायिक जाहिरात समाविष्ट नसावी, उल्लेख नसावा.
- व्हिडीओ मधील मजकूर व आशयाबाबत पूर्णतः संबंधित शिक्षक जबाबदार असणार आहे, याची नोंद घ्यावी.

- **व्हिडीओ मध्ये वापर करण्यात येणारी इमेज अथवा मजकूर हा कॉपीराईट मुक्त (Creative Commons) असण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. कॉपीराईटची लायसन्सच्या सर्व मार्गदर्शक सूचनांची काळजी घ्यावी. याबाबत काही आक्षेप आल्यास संबंधित स्पर्धक जबाबदार असतील.**
- **राज्यस्तरावरून निवड करण्यात आलेल्या व्हिडीओजच्या creator ला तो व्हिडीओ त्यांनीच तयार केला आहे हे सिद्ध करावे लागेल. अन्यथा तो व्हिडीओ स्पर्धेतून बाद करण्यात येईल.**
- **शैक्षणिक व्हिडिओच्या दर्जानुसार शिक्षकांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाईल व सदरच्या दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओज हे त्याच्या creator च्या नावासह शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.**
- **स्टॉक शॉट्स किंवा कोणतेही कॉपीराइट केलेले ग्राफिक्स/इमेज संकलित करून तयार केलेले व्हिडिओ स्पर्धेसाठी पात्र नसतील.**
- **एका स्पर्धकाने एका गटासाठी फक्त एकच व्हिडिओ पाठवावा.**
- **सर्व नोंदींची एक प्रत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राखून ठेवली जाईल.**
- **पुरस्कार विजेत्या व्हिडिओचे प्रसारण DIKSHA/OER आणि SCERT द्वारे व्यवस्थापित इतर वेबसाइट्स/पोर्टलवर अपलोड करण्यात येतील.**
- **तालुका/ जिल्हा/ राज्य स्तरावरील स्पर्धांचे निकाल तालुका/ जिल्हा/ राज्य निवड समिती मार्फत अंतिम केला जाईल (स्वतंत्रपणे ऑडिओ आणि ॲनिमेशन/इमर्सिव्ह ई-कॉन्टेंट/डिजिटल गेम्स आणि ॲप्लिकेशन श्रेणीसाठी) ज्युरीने घोषित केलेले निकाल बंधनकारक असतील.**

**व्हिडिओ रद्द करण्याचे अधिकार -**

- कोणत्याही प्रकारची हिंसा, लैंगिक प्रदर्शन, असभ्य भाषा, अमली पदार्थांचा वापर यांचा व्हिडीओ निर्मितीत समावेश असल्यास,
- वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक, स्त्रिया किंवा लिंग पूर्वाग्रहाचे समर्थन करणारी सामग्री व्हिडीओ निर्मितीत समावेश असल्यास,
- तांत्रिक त्रुटीं असल्यास ( उदा. सुरु न होणे, मध्येच बंद होणे) ,
- कोणत्याही कॉपीराइट कायद्याचे उल्लंघन असल्यास,
- साहित्यिक चोरीचा (plagiarism)समावेश असल्यास,

असे व्हिडीओ पडताळणी अंती कोणत्याची स्तरावर बाद करण्यात येतील. यावर स्पर्धकाचा कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**निवड समितीची रचना**- वरीलप्रमाणे प्रत्येक तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विषय व गटनिहाय प्रथम तीन क्रमांक निवडण्यात येतील. सदर उत्कृष्ट शिक्षकांना उपरोक्तप्रमाणे रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन गौरवांकीत करण्यात येईल. तसेच सहभागी स्पर्धक यांनाही सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

सदर निवड करण्याकरिता तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे-

## तालुका स्तरावरील निवड समिती

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| ०१ | गटशिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी | अध्यक्ष |
| ०२ | अधिव्याख्याता, DIET | सदस्य |
| ०३ | तंत्रस्नेही/पुरस्कार प्राप्त शिक्षक (०२) | सदस्य |
| ०४ | विस्तार अधिकारी (शिक्षण)/केंद्रप्रमुख | सदस्य सचिव |

## जिल्हा स्तरावरील निवड समिती

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| ०१ | प्राचार्य, DIET | अध्यक्ष |
| ०२ | वरिष्ठ अधिव्याख्याता, DIET | सदस्य |
| ०३ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| ०४ | तंत्रस्नेही/पुरस्कार प्राप्त शिक्षक (०२) | सदस्य |
| ०५ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य सचिव |

## राज्य स्तरावरील निवड समिती

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचारी | समितीतील पद |
|---|---|---|
| ०१ | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | अध्यक्ष |
| ०२ | राष्ट्रीय ICT पुरस्कार प्राप्त शिक्षक (०२) | सदस्य |
| ०३ | उपविभागप्रमुख, आय. टी. | सदस्य |
| ०४ | उपविभागप्रमुख, प्रसार माध्यम | सदस्य |
| ०५ | प्राचार्य (आय. टी. व प्रसार माध्यम), राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव |

**कालावधी-** प्रस्तुत पुरस्कार दरवर्षी खालीलप्रमाणे कालावधीत आयोजित करण्यात येतील,

| **अ. क्र.** | **महिना** | **तपशील** |
|---|---|---|
| ०१ | मे | जाहिरात प्रसिद्धी |
| ०२ | जून | ऑनलाईन नामांकन नोंदणी |
| ०३ | जुलै | तालुका व जिल्हास्तर निवड समितीमार्फत पडताळणी व पुढील टप्प्यासाठी उत्कृष्ट उमेदवारांची शिफारस |
| ०४ | ऑगस्ट | राज्यस्तर निवड समितीमार्फत पडताळणी व अंतिम उत्कृष्ट उमेदवारांची शासनास शिफारस |
| ०५ | सप्टेंबर | पुरस्कार वितरण समारंभ |

खर्च तपशील- प्रस्तुत स्पर्धांसाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे,

| स्तर | एकूण तालुके | गट | क्रमांक | रक्कम | एकूण पुरस्कार | खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| तालुका | ४०८ | **इयत्ता १ ली ते अध्यापक विद्यालय = एकूण गट ६** | प्रथम | ३००० | २८ | ३,४२,७२,००० |
| | | | द्वितीय | २००० | २८ | २,२८,४८,००० |
| | | | तृतीय | १५०० | २८ | १,७१,३६,००० |
| **अ** | | | | | | **७,४२,५६,०००** |
| जिल्हे | ३६ | **इयत्ता १ ली ते अध्यापक विद्यालय = एकूण गट ६** | प्रथम | १०००० | २८ | १,००,८०,००० |
| | | | द्वितीय | ९००० | २८ | ९०,७२,००० |
| | | | तृतीय | ८००० | २८ | ८०,६४,००० |
| **ब** | | | | | | **२,७२,१६,०००** |
| राज्य | १ | **इयत्ता १ ली ते अध्यापक विद्यालय = एकूण गट ६** | प्रथम | ५०००० | २८ | १४,००,००० |
| | | | द्वितीय | ४०००० | २८ | ११,२०,००० |
| | | | तृतीय | ३०००० | २८ | ८,४०,००० |
| **क** | | | | | | **३३,६०,०००** |
| **ड** | | | | | **(अ+ब+क) एकूण** | **१०,४८,३२,०००** |

| | | | |
|---|---|---|---|
| **इ** | आकस्मिक खर्च | पोर्टल विकसन | ५०,००,००० |
| | | तालुका, जिल्हा, राज्य स्तर बैठका | ० |
| | | पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजन, प्रमाणपत्रे व सन्मानचिन्ह | २५,००,००० |
| | | | **७५,००,०००** |
| ई | | **(ड + ई ) एकूण** | **११,२३,३२,०००** |
| **(अक्षरी अकरा कोटी तेवीस लाख बत्तीस हजार रुपये मात्र )** | | | |

उपरोक्त उपक्रमाच्या अनुषंगाने येणारा सर्व खर्च राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे अंतर्गत येणाऱ्या “प्रशिक्षण” या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

सदर स्पर्धेबाबत / उपक्रमाबाबत सविस्तर सुचना संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी निर्गमित करण्यात याव्यात. सदर स्पर्धेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांना असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०५१११८४८३०४३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

IMTIYAZ
MUSHTAQUE KAZI

Digitally signed by IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT,
2.5.4.20=39a40419de755c2eab61fb555b2fdf8c8d6d652ff18fdffbd9c748ab01f6da04, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=77A529748C5E7C1BA7A66E81C654BA3C492FDA5B29E076241DB1BA213DDEDF4E, cn=IMTIYAZ MUSHTAQUE KAZI
Date: 2023.05.12 16:47:26 +05'30'

**( इ. मु. काझी )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
६. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
७. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे.
९. शिक्षण संचालक, (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) शिक्षण संचालनालय, पुणे.
१०. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
१२. संचालक,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.

१३. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व विभाग).
१४. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व).
१५. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.
१६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद, (सर्व).
१७. शिक्षणाधिकारी / शिक्षणप्रमुख / प्रशासनाधिकारी, महानगरपालिका, (सर्व).
१८. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व).
१९. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद, (सर्व).
२०. निवडनस्ती (एसडी-४).